01-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/31/2025 9:53 PM Page 1



निवडक



शिवोली : काँग्रेस ब्लॉक कमिटी बैठकीत सहभागी सदस्य

## शिवोली काँग्रेस ब्लॉक कमिटी बैठकीत विविध विषयावर चर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ३१ :** सर्व सदस्यांनी एकजूट राहून पक्ष बळकट करण्याचा निर्धार शिवोली ब्लॉक काँग्रेसच्या बैठकीत घेण्यात आला. बैठक काँग्रेस ब्लॉक अध्यक्षा पार्वती नागवेकर यांच्या पुढाकाराने शापोरा येथे घेण्यात आली.

या बैठकीत प्रदेश काँग्रेस कमिटी सदस्य राजेश कोचरेकर, शिवोली मतदारसंघ प्रभारी प्रदीप देसाई, बलभीम मालवणकर, ॲलेक्स नोरोन्हा, कपिल कोरगावकर, टॉमस माचेडो, प्रदीप नाईक, जॉन डिसोझा, सुनीता गोलतेकर व इतर उपस्थित होते. शिवोली काँग्रेस ब्लॉकशी संबंधित अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. सर्व सदस्यांनी ब्लॉक अध्यक्षा श्रीमती पार्वती नागवेकर यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. पार्वती नागवेकर यांनी ब्लॉक अध्यक्षपदवर कायम ठेवण्यासाठी समर्थन द्यावे, असा ठराव घेण्यात आला. बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली आणि बूथवरील नवीन सदस्यांची तसेच समिती सदस्यांची नावे वाचून दाखवण्यात आली. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसा बाबतही विचारविनिमय करण्यात आला.

---

## मांद्रे हायस्कूलमध्ये आज 'बाजार डे'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** मांद्रे हायस्कूल व शाळेच्या पालक शिक्षक संघातर्फे 'बाजार दिवस' मंगळवार दि. १ रोजी सकाळी ९ ते १२ पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या बाजाराचे उद्घाटन माजी विद्यार्थी तथा गावातील एक जुने दुकान, त्या दुकानाच्या मालकीचे तिसऱ्या पिढीतील सदस्य श्रीकांत पेडणेकर, जे सध्या गोवा शासनात डेप्युटी कमिशनर ऑफ एक्साईज यांच्या हस्ते होईल . तसेच गावचे सरपंच राजेश मांद्रेकर व संस्थेचे चेअरमन नीलेश मांद्रेकर उपस्थित राहणार आहेत.सर्व पालक व ग्रामस्थांनी बाजाराला भेट देऊन विद्यांर्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मुख्याध्यापिका अपर्णा प्रभू व पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा नेत्रा मांद्रेकर यांनी केले आहे.

---

## आगोंद येथे ६ रोजीपासून मुलां-मुलींसाठी उन्हाळी क्रिकेट शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३१ :** मराठा वोरियर्स क्रिकेट क्लब काणकोण व गोवा क्रिकेट असोसिएशन संलग्न, १० ते १६ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील मुलां-मुलींसाठी उन्हाळी क्रिकेट शिबीर दि. ६ एप्रिल ते दि.३० एप्रिल २०२५ पर्यंत आगोंद येथील शासकीय मैदानावर आयोजित करण्यात येईल. अधिक माहितीसाठी अखिल- ९८२३८९९५९९, समीर- ९८२३११७१९८, सम्राट - ७५०७८०३८१२ किंवा किरण - ९४२३८१३९५५ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

## मोरजी येथील देव कुळकार-म्हालसा देवस्थानचा ६ रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ३१ :** पोकेवाडा, मोरजी, पेडणे येथील श्री देव कुळकार-म्हालसा देवस्थानचा वार्षिक वर्धापनदिन रविवार दि. ६ रोजी विविध कार्यक्रमांनिशी संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी अभिषेक, पुजा सकाळी १० वाजता वार्षिक सत्यनारायण पुजा, दुपारी महिलांतर्फे दिवजोत्सव नंतर आरती व महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी ५.३० वाजता श्री कुळकार म्हालसा वर्धापनदिन निमित्त कै. अनंत पोके यांच्या स्मरणार्थ मोरजी पंचायतन कला संस्था आयोजीत 'स्वर अभिषेकी' हा गायनाचा कार्यक्रम होईल. यात मुंबई, महाराष्ट्र येथील प्रसिद्ध गायक व शौनक अभिषेकी यांचे सुपुत्र अभेद शौनक अभिषेकी यांचे गायन होणार आहे. यात ऑर्गनः उद्देश पेडणेकर, तबलाः बुद्धेश तळकर, हामोनियमः सुनाद कोरगावकर, मंजिरीः सागर पेडणेकर यांची संगीतसाथ लाभणार आहे.

या कार्यक्रमात ज्येष्ठ मान्यवरांचा सत्कार व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

# भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेचे वेळापत्रक जाहीर!

### बीसीसीआयची मोठी घोषणा : वनडे आणि टी-२० मालिका खेळणार

**नवी दिल्ली, दि. ३१ :**



भारतीय क्रिकेट बोर्डाने भारतीय संघाचं ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. भारतीय संघ ऑक्टोबर २०२५ मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहेत. येथे वनडे आणि टी-२० मालिका खेळल्या जाणार आहेत. रोहित शर्मा आणि विराट कोहली वनडे मालिकेचा हिस्सा असू शकतात. तसेच टी२० मालिकेसाठी सूर्यकुमार यादव किंवा हार्दिक पांड्या यांच्यामध्ये कोणाला तरी कर्णधार पदाची जबाबदारी मिळू शकते. याच्यावर कोणतीही अजून अधिकृत माहिती मिळालेली नाही.

बीसीसीआयने सोमवारी एक्स वर पोस्ट शेअर केली आहे. बोर्डाने याच्या माध्यमातून सांगितले आहे की, टीम इंडिया यावर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. भारताची ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाण्याची माहिती आधी मिळाली होती, पण याची अधिकृत घोषणा सोमवारी करण्यात आली आहे. भारतीय पुरुष संघ दौऱ्यावर तीन वनडे आणि पाच टी२० मालिका खेळणार आहे. तसेच भारतीय महिला संघ फेब्रुवारी २६ मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. ते तिथे वनडे आणि टी-२० मालिकेसोबत एक कसोटी सामना सुद्धा खेळणार आहेत.

भारतीय संघ १९,२३ आणि २५ ऑक्टोबर रोजी वनडे मालिका खेळणार आहे. मालिकेतील पहिला सामना पर्थ, दुसरा एडिलेड आणि तिसरा सामना सिडनीमध्ये खेळला जाणार आहे. तसेच २९ ऑक्टोबर पासून ८ नोव्हेंबर पर्यंत टी२० मालिका खेळली जाईल.

भारतीय महिला संघ पुढच्या वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाईल. तेथे १५ फेब्रुवारी १९ फेब्रुवारी आणि २१ फेब्रुवारी रोजी टी२० सामने खेळेल. मालिकेतील पहिला सामना सिडनी, दुसरा कैनबरा आणि तिसरा एडिलेडमध्ये खेळला जाईल. यानंतर २४ फेब्रुवारी, २% फेब्रुवारी, आणि १ मार्च रोजी वनडे सामने खेळले जातील. तसेच एक कसोटी सामना ६ मार्च रोजी खेळला जाईल.

## नववर्षाचे काणकोणात जल्लोषात स्वागत

▶ गायतोंडे मैदानावर उभारली सामुहिक गुढी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३१ :** राज्य भरात काल गुढी पाडवा सण उत्साहात साजरा करण्यात आला. कणकोण तालुका पातळीवर मोठ्या संख्येने गुढी पाडव्या निमित्त जाहिर कार्यक्रम गायतोंडे मैदानावर काल रोजी साजरा करण्यात आला.

गुढी उभारण्याच्या वेळी सभापती रमेश तवडकर, राजू राणे, बाबू कोमरपंत, नवनाथ सावंत अजित पैंगीणकर व अन्य उपस्थित होते. सुरुवातीला पहाटे ५.४५ वाजता चावडीवरील मारुती मूर्तीला पुष्पहार घालून प्रभात फेरीला सुरुवात करण्यात आली. या शोभायात्रेत छ. शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी, अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. प्रभात फेरी पालिका क्षेत्रापुरती मर्यादित होती.

त्यानंतर सकाळ ७ वाजता येथील सुहासिनीकडून पुरोहित चिन्मय आमशेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्र उद्घोषात सुर्याची ओवाळणी करण्यात आली. त्यानंतर नववर्षाची सामुहिक गुढी उभारण्यात आली. व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम सादर करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्र निवेदन सौ. अनिषा च्यारी हीने केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय कार्यक्रमाचे नियोजक श्री.दिलखुष शेट यांनी केले, व्यासपीठावर प्रमुख पाहुण्या तसेच वक्त्या संपदा प्रभू त्याचप्रमाणे, मारुती देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश फळदेसाई, ज्येष्ठ नागरिक बाबू कोमरपंत पंचांग वाचक चिन्मय आमशेकर तसेच दिलखुष शेट आदी उपस्थित होते. आभार प्रदर्शन पंकज ना.गावकर याने केले.



**चावडी : गायतोंडे मैदानावर नव वर्ष गुढी उभारताना सभापती रमेश तवडकर. बाजूसा राजू राणे, बाबू कोमरपंत, रंगनाथ कोमरपंत, नवनाथ सावंत अजित पैंगीणकर व इतर.**

## रियान परागला १२ लाख रुपयांचा दंड

**मुंबई, दि. ३१ :**

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याला बीसीसीआयने स्लो ओव्हर रेटसाठी १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. आरआरने ३० मार्च रोजी गुवाहाटी येथे चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध हंगामातील त्यांचा ११ वा सामना खेळला. यामध्ये राजस्थान संघ दुसऱ्या डावात मैदानात उतरला. संघ निर्धारित वेळेत २० षटके टाकू शकला नाही. यानंतरही राजस्थानने पहिला विजय नोंदवला होता. संघाने सीएसकेचा ६ धावांनी पराभव केला.

आयपीएल २०२५ मधील हा दुसरा स्लो ओव्हर रेटचा खटला आहे. यापूर्वी, मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्यालाही गुजरात टायटन्सविरुद्ध याच कारणामुळे १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. यामुळे, त्याच्या संघाला सामन्याच्या शेवटच्या षटकात ३० यार्डच्या वर्तुळात एक अतिरिक्त क्षेत्ररक्षक ठेवावा लागला.

या हंगामात हार्दिक पंड्यावर त्याच्या सामन्यात बंदी घालण्यात आली होती.आता स्लो ओव्हर रेटमुळे कर्णधारावर सामन्यांसाठी बंदी घालण्यात येणार नाही. १८ व्या हंगामापासून, बीसीसीआयने कर्णधारावर सामन्याची बंदी घालण्याचा नियम रद्द केला आहे. आता संघाच्या कर्णधारावर स्लो ओव्हर रेटमुळे बंदी घालण्यात येणार नाही. आता फक्त सामना शुल्क दंड आणि क्षेत्ररक्षण निर्बंध लागू केले जात आहेत.

राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ मध्ये पहिला विजय नोंदवला. याआधी संघाला सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. प्रथम फलंदाजी करताना संघाने सीएसकेसमोर १८३ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात चेन्नई संघाला फक्त १७६ धावा करता आल्या.

राजस्थानचा पुढचा सामना ५ एप्रिल रोजी पंजाब किंग्जविरुद्ध होईल. हा सामना मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल. हा पंजाबचा लीगमधील तिसरा आणि राजस्थानचा चौथा सामना असेल.

## नवीन वर्षात आरोग्यमय जगण्याचा संकल्प करूया

▶ मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : साखळीत मंगल यात्रा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड





**डिचोली, दि. ३१ :** गुढीपाडव्यातून सुरू होणारे नवे वर्ष हे सदैव नवीन काहीतरी संकल्प करण्याचे पर्व आहे. यावर्षीच्या या संकल्पदिनी सर्वांनी आपले आरोग्य निरोगी ठेवण्याचा तसेच सुख समृद्धीचा संकल्प करावा. त्याचबरोबर प्लास्टिकच्या राक्षसापासून मुक्तता करून घेत आपला गाव, शहर, राज्य व देश स्वच्छ ठेवण्याचाही संकल्प सर्वांनी करावा. दिवसेदिवस लोकांच्या लहान वयातच वाढत असलेल्या आरोग्याच्या तक्रारी या चिंताजनक स्वरूप घेत आहे. या नवीन वर्षापासून आपले आरोग्य स्वास्थ राखण्यासाठी संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले.

साखळी नववर्ष स्वागत समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या नववर्ष स्वागत सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी साखळीच्या नगराध्यक्षा सिद्धी प्रभू, नववर्ष स्वागत समितीचे अध्यक्ष सचिन कर्पे, राधिका कामत सातोसकर, उपनगराध्यक्ष आनंद काणेकर, नगरसेविका रश्मी देसाई व मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

गुढीपाडव्याच्या निमित्ताने घरोघरी उभारण्यात येणारी गुढी ही सदैव नवीन आशा, आकांक्षा व संकल्पनांनी भरलेली असावी. कौटुंबिक सुख, सौख्य तसेच कुटुंबाचे व आपलेही आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येकाने आतापासूनच सतर्कता बाळगावी. देशाला सुख व समृद्धी देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत २०४७ ची गुढी यापूर्वीच रोवली असून या संकल्पानुसार भारत विकसित होणार आहेच. परंतु विकसित भारत पाहताना आपले सर्वांचे आरोग्य ही निरोगी असणे फार महत्त्वाचे आहे. असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले.

पूर्वी गोव्यात साखर हा प्रकार नव्हताच. घरात कोणीही नातेवाईक आल्यास घरात पाणी व गुळ दिले जायचे. परंतु १९६१ नंतर गोव्यात साखरेचे प्रमाण वाढले. लोक साखर खाण्यास जास्त प्राधान्य देऊ लागले. आता तर लोकांच्या शरीरात सर्रासपणे साखर मिळू लागली आहे. त्याचे परिणाम दीर्घकालीन लोकांच्या आरोग्यावर होऊ लागले असून मधुमेहामुळे अनेक इतर व्याधी लोकांना होऊ लागलेल्या आहेत. त्यासाठी केवळ आपल्या जिभेला रूच भागविण्यासाठी खाण्यापेक्षा आपल्या शरीराला आवश्यक असलेले घटकच आपण ग्रहण करावे. जेणेकरून आपल्या शरीराचे स्वास्थ्य राखण्यास मदत होईल, असेही मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी यावेळी म्हटले.

सकाळी ६.४५ वा. जुन्या बसस्थानकावर बाजारात ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती. त्यानंतर बाजार ते गोकुळवाडी येथील श्री राधाकृष्ण मुरलीधर संस्थान पर्यंत मंगलयात्रा काढण्यात आली. या यात्रेत मुख्यमंत्र्यांनी सहभाग घेऊन दिंडीबरोबर ठेका धरला. राधाकृष्ण मुरलीधर संस्थानात घंटानाद झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शन केले व या कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व उपस्थित भाविकांना कडुनिंबाची चटणी वाटण्यात आली.

# राजस्थानचा चेन्नईवर थरारक विजय

### धोनी-जडेजा सगळे फेल : कर्णधार रियानचा आयपीएल मधील पहिला विजय ठरला खास

**गुवाहाटी, दि. ३१ :**



राजस्थान रॉयल्सने घरच्या मैदानावरील अखेरच्या सामन्यात अखेरीस थरारक विजयाची नोंद केली. रियान परागच्या नेतृत्त्वाखालील राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा अवघ्या ६ धावांनी पराभव केला. राजस्थान रॉयल्सने या सामन्याला चांगली सुरुवात केली, पण जशी सुरूवात केली त्या अपेक्षेप्रमाणे संघ धावसंख्या उभारू शकला नाही आणि विजयसाठी सीएसकेला १८३ धावांचे लक्ष्य दिले. पण चेन्नईचा संघ निर्धारित २० षटकांत ६ विकेट गमावत १७६ धावा करूच शकला. जडेजा आणि धोनी दोघेही मैदानावर होते, पण धोनी बाद झाला त्यानंतर जडेजा शेवटपर्यंत मैदानात कायम होता, पण यावेळेस मात्र तो संघाला विजय मिळवू देऊ शकला नाही. राजस्थानसाठी नितीश राणा आणि वानिंदू हसरंगा हिरो ठरले. तर अखेरचं षटक टाकणारा संदीप शर्मा उत्कृष्ट गोलंदाजी करत संघाच्या विजयाचा हिरो ठरला.

राजस्थान रॉयल्सचा सुरुवातीच्या तीन सामन्यांसाठी कर्णधार असलेल्या रियान परागला पहिला विजय नोंदवला आहे. कर्णधार म्हणून पहिल्या दोन्ही सामन्यात त्याच्या नेतृत्त्वाखाली संघाला पराभवाचा धक्का बसला. पण तिसऱ्या सामन्यात बलाढ्य सीएसकेचा पराभव करत मिळवलेला विजय रियानसाठी खास ठरला. आयपीएलमध्ये कर्णधार म्हणून रियान परागच्या नेतृत्त्वाखाली हा संघाचा पहिला विजय आहे.

अखेरच्या षटकात संदीप शर्माला १९ धावांचा बचाव करायचा होता. संदीपने पहिलाच चेंडू वाईड टाकला. धोनी स्ट्राईकवर होता, दुसऱ्या चेंडूवर धोनीने मोठा फटका खेळायचा गेला आणि सीमारेषेजवळ झेलबाद झाला. चेन्नईच्या विजयाच्या आशांना इथे धक्का बसला. यानंतर दुसऱ्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने १ धाव घेत जडेजाला स्ट्राईक दिली. यानंतर तिसऱ्या चेंडूवर जडेजाने १ धाव घेतली. यानंतर चौथ्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने षटकार खेचला. पण पाचव्या चेंडूवर त्याने २ धाव घेतल्या आणि अखेरच्या चेंडूवर त्याला ९ धावा करायच्या होत्या, जे अशक्य होतं आणि अशारितीने शेवटच्या चेंडूवर २ धावा घेत राजस्थानचा संघ विजयी ठरला.

राजस्थानने दिलेल्या १८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरूवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकात जोफ्रा आर्चरने रचिन रवींद्रला बाद करत चेन्नईला मोठा धक्का दिला. यानंतर ऋतुराज गायकवाड आणि राहुल त्रिपाठीने संथ सुरूवात करत काही फटके मारले. पण राजस्थाच्या संघाने विकेट्स घेत सामन्यात पुनरागमन करू दिले नाही.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने १८२ धावांची मजबूत धावसंख्या उभारली. यशस्वी जैस्वाल पहिल्याच षटकात बाद झाला. पण यावेळी राजस्थानने आपली चूक सुधारत तिसऱ्या क्रमांकाचा स्पेशालिस्ट नितीश राणाला पाठवले. याचा फायदा अखेर संघाला मिळाला आणि राणा येताच त्याने चेन्नईच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. नितीश राणाने अवघ्या ३६ चेंडूत ८१ धावांची स्फोटक खेळी खेळली. सामनावीर ठरलेल्या नितीश राणाने पॉवरप्लेमध्येच २१ चेंडूत अर्धशतक झळकावत रविचंद्रन अश्विन, खलील अहमद आणि जेमी ओव्हरटन यांची धुलाई केली. नितीशला शतक पूर्ण करता आले नाही पण त्याने संघासाठी चांगल्या धावसंख्येचा पाया रचला. त्यांच्याशिवाय कर्णधार रियान पराग आणि संजू सॅमसन यांनीही थोडेफार योगदान दिले. नूर अहमद आणि मथिशा पाथिराना यांनी चेन्नईसाठी चांगली कामगिरी केली.

## पेप्स इंडस्ट्रीजकडून गोव्यात नवीनतम आलिशान गाद्यांच्या श्रेणीचे अनावरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३१ :** नवीनतम आलिशान गाद्यांच्या श्रेणीचे अनावरण करताना भारतातील आघाडीच्या स्लीप सोल्युशन्स ब्रँड पेप्स इंडस्ट्रीजने गोव्यातील ग्राहकांना जागतिक दर्जाचे उत्पादन देऊ केले आहे. चार नवीन उत्पादन मालिका लाँच करून हा ब्रँड गोव्यात आणण्यासाठी कंपनी सज्ज आहे.

परवडणाऱ्या किमतीच्या वचनबद्धतेसह विकसित केलेल्या पेप्सच्या नवीन श्रेणीने चार नवीन उत्पादन मालिका, पेप्स कम्फर्ट, पेप्स सुप्रीम आणि पेप्स रेस्टोनिक मेमरी फोम लाँच केल्या आहेत. ज्या आराम, आधार आणि टिकाऊपणा पुन्हा परिभाषित करण्यासाठी सज्ज आहेत. शांत व सुखद झोपेसाठी या गाद्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेल्या आहेत, ज्यामुळे इष्टतम आराम आणि शांत झोप मिळते. गोव्यातील उद्घाटन प्रसंगी बोलताना प्पेप्स इंडस्ट्रीजचे सह-संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्जी. शंकर रॅम म्हणाले की, गोव्यात आमच्या नवीन गाद्यांच्या कलेक्शनचे लाँचिंग पेप्सच्या नावीन्यपूर्ण, गुणवत्ता आणि परवडणाऱ्या गाद्यांच्या कटिबद्धतेला बळकटी देते. ग्राहकांना उत्कृष्ट गाद्या य देत असताना, आमची नवीनतम श्रेणी पेप्स कम्फर्ट, पेप्स सुप्रीम आणि पेप्स रेस्टोनिक मेमरी फोम त्यांच्या गरजा उत्तम प्रकारे पूर्ण करते. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक साहित्य यांचे संयोजन करून, आराम आणि टिकाऊपणा आणला आहे. झोपेच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढत असताना, पेप्सला भारतीय ग्राहकांच्या अद्वितीय पसंतीनुसार तयार केलेली जागतिक दर्जाची उत्पादने ऑफर करण्याचा अभिमान आहे.'पेप्स कम्फर्ट हे सर्वोत्तम स्टीलच्या उच्च-कार्बन, स्टील वायरने बनवलेले आहे जे टिकाऊपणा वाढवते. ही गादी प्रगत युरोपियन तंत्रज्ञानाचा वापर करून बनवली आहे आणि त्यात लोखंड-प्रतिरोधक फ्लॅट-निटेड पॉलिस्टर फॅब्रिक आणि ९३ टक्के बायोडिग्रेडेबल मटेरियल आहे. रात्रीच्या शांत झोपेसाठी डिझाइन केलेल्या पेप्स सुप्रीममध्ये पॉकेटेड स्प्रिंग्ज आहेत, जे हालचालींमध्ये अडथळा दूर करतात. जगातील सर्वात प्रगत पॉकेटेड स्प्रिंग तंत्रज्ञानासह उत्पादित ही गादी टिकाऊपणा, श्वास घेण्याची क्षमता आणि आरामासाठी तयार केले आहे. पेप्स रेस्टोनिक मेमरी फोममध्ये पेप्स सॅनिबेल बोनेल प्लश मेमरी फोम आणि पेप्स आर्डेन पॉकेटेड प्लश मेमरी फोम यासह दोन नवीन लाँच आहेत. अमेरिकन रेस्टोनिक ग्रेट स्लीप सिरीजचा भाग, पेप्स सॅनिबेल बोनेल प्लश मेमरी फोम हा एक हायब्रिड गादी आहे जी तापमान आणि दाब-संवेदनशील श्वास घेण्यायोग्य मेमरी फोम एकत्रित करते. याव्यतिरिक्त, पेप्स आर्डेन पॉकेटेड प्लश मेमरी फोम ही एक उत्तम लक्झरी गादी म्हणून काम करते. ही गादी अतुलनीय आराम आणि शांत झोप देते.




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 208 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .